## महिला बचत गटाच्या सक्षमीकरणाकरीता तसेच व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटास अर्थसहाय्य देणे.

**योजना उद्देश** :- नमुंमपा क्षेत्रातील ज्या महिलांना बचतगट सुरु केला असेल व असा बचतगट स्थापन होऊन किमान ०२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असेल महिला बचत गटास या योजनेचा लाभ देण्यात येईल. तसेच नमुंमपा क्षेत्रात ज्या महिला बचत गटांनी, गटातील महिलांना स्वयंरोजगार मिळावा या हेतूने व्यवसाय सुरु केला आहे, अशा व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे व त्यांना सक्षम करणेकरीता या योजनेचा लाभ देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** :- नवी मंबई महानगरपालिका

**प्रस्तावित लाभार्थी** :- १. एकूण ४७० गट ( अ-१७० गट, ब-१५० गट व क-१५० गट) अंदाजे (सक्षमीकरणाकरीता अर्थसहाय्य देणेकरीता)
२. एकूण २० महिला बचत गट (व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटांस अर्थसहाय्य देणेकरीता)
**(प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य)**

**अनुदानाची रक्कम** :- १. किमान ५,३,२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असेल अशा बचत गटास खेळता निधी म्हणून अर्थसहाय्य रक्कम "अ-श्रेणी" गटास रु. १५,०००/-, "ब-श्रेणी" गटास रु.१०,०००/-, व "क-श्रेणी" गटास रु.५,०००/- इतके अर्थसहाय्य मिळण्यास असा महिला बचत गट पात्र असेल.
२. अर्थसहाय्य रक्कम - रु. १०,०००/-

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. हे अर्थसहाय्य किमान ५,३,२ वर्षे पूर्ण झालेल्या व नियमित मासिक बचत असणाऱ्या महिला बचत गटास मिळू शकेल.
२. अर्थसहाय्य गट स्थापन करुन किमान ४ वर्षे पूर्ण झालेल्या व नियमित मासिक बचत असणाऱ्या व सामुदायिक व्यवसाय अथवा गटातील किमान ५०% सदस्या व्यवसाय करत असणा-या महिला बचत गटास मिळू शकेल.
३. महिला बचत गटांनी त्यांचे बचतीच्या संबंधात लेख्यांच्या नोंदी अद्यावत ठेवलेल्या असाव्यात.
४. महिला बचत गटांची मासिक बैठक नियमीत व बचतीसाठी जमा करण्यात येणाऱ्या बचतीची मासिक वर्गणी नियमीत भरणा केलेली असावी. याबाबत ठरावाच्या नोंदीची छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील.
५. महिला बचत गटामधील सर्व महिलांची यादी सोबत जोडणे आवश्यक राहील.
६. बचत गटाच्या पॅनकार्डची प्रत जोडणे आवश्यक राहील.
७. बचत गटामार्फत करत असलेल्या व्यवसायाचा तसेच त्यापासून मिळत असलेल्या मासिक उत्पन्नाचा तपशिल सोबत जोडणे आवश्यक राहील.
८. व्यवसायासाठी वापरात असलेल्या जागेबाबतचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक राहील.
९. बचत गटाच्या बँक पासबुकची खाते सुरु केल्यापासून आजतागायत प्रती सोबत जोडणे आवश्यक राहील.
१०. अर्जासोबत तिन्ही पदाधिका-यांचे अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचे फोटो लावणे आवश्यक राहील.
११. महिला बचत गटाच्या बँक खात्यामध्ये किमान रु. १०,०००/- शिल्लक असणे आवश्यक आहे तसेच रक्कम कर्ज स्वरुपात दिली असल्यास किंवा ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक केली असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
१२. या निधीचा उपयोग महिला बचत गटामार्फत सुरु असलेल्या उद्योगाच्या/व्यवसाच्या सक्षमीकरणाकरीता करण्यात यावे.
१३. बचत गटाचे खाते हे राष्ट्रीयकृत, शेड्युल्ड बँक किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक (गव्हर्नमेंट अंडरटेकींग) यामध्ये असेल त्या बचत गटांनाच या योजनेचा लाभ घेता येईल.
१४. अशा प्रकारचे अर्थसहाय्य एकदाच गटाला मिळू शकेल.
१५. सदर योजनेचा लाभ गटामार्फत सुरु असलेल्या व्यवसाय तसेच त्यांच्या बचतीच्या लेख्याची तपासणी केल्यानंतर पात्र ठरेलल्या महिला बचत गटास देण्यात येईल.
१६. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
१७. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

**महिला व बालकल्याण समिती अंतर्गत तरतुदीमधून :-** अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून

अर्ज विनामुल्य

# नवी मुंबई महानगरपालिका

पदाधिका-यांचे पासपोर्ट आकाराचे छायांकित फोटो

## महिला बचत गटाच्या सक्षमीकरणाकरीता तसेच व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटास अर्थसहाय्य मिळणेबाबत.

१. बचत गटाचे नांव :- ---------------------------------------------------------------

२. संपूर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

प्रभाग क्र. _______, ------------------------- विभाग, नवी मुंबई.

किती वर्षापासून वास्तव्य _______. संपर्क क्र. _________________________

३. नोंदणी क्र. व स्थापनेचा दिनांक :- क्र. ____________________ स्था. दि. ______/______/________

४. सदस्यांची एकूण संख्या :- ________

५. उद्योग करण्यासाठी वापर करत असलेली जागा :- स्वतःची / भाड्याने (तपशिल द्यावा) --------------------

६. यापुर्वी महानगरपालिका, शासन व इतर संस्था मार्फत अनुदान, साहित्य किंवा मदत मिळालेली आहे / नाही ----------- असल्यास, केव्हा ____________ स्वरुप ------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

७. बचत गटाच्या पदाधिका-याचे नांव व पत्ता -

अध्यक्ष / सचिव - -------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------- संपर्क क्र. __________________

८. बचत गटामार्फत राबविण्यात येत असलेले उपक्रम (लिखित / प्रकाशित / छायाचित्रांकीत संदर्भ असल्यास उपलब्ध करुन द्यावेत) :- ------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

## <u>हमीपत्र</u>

मी, श्रीम.----------------------------------, अध्यक्ष/सचिव ------------------------------------- बचत गट याद्वारे हमी देते की, वरील विषयात नमुद केलेल्या कारणासाठी आमचे बचतगटास महानगरपालिका / शासन वा अन्य संस्थेकडून या योजनेअंतर्गत लाभ घेतलेला नाही. नवी मुंबई महानगरपालिकेकडून मिळणा-या लाभाचा उपयोग आम्ही बचतगटाच्या उद्योगाच्या सक्षमीकरणाकरीताच करु, गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास होणाऱ्या संभाव्य कायदेशीर कारवाईस आमची हरकत असणार नाही. तरी आमचे बचत गटास अर्थसहाय्य मिळणेस विनंती आहे.

दिनांक :- _____/_____/_______

**महिला बचत गट प्रमुखाची**
**सही व शिक्का**

## कार्यालयीन कामाकरीता

१ अर्ज क्रमांक :- _______
२ अर्जदार यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे/नाही :- --------------
३ लाभार्थी पात्र /अपात्र :- -----------------
४ सदर लाभार्थ्यांनी यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही. त्यांनी मागणी केलेल्या योजनेचा लाभ देण्यास मंजूरीस्तव सादर.
५ मागील वर्षी लाभ घेतलेल्या योजनेचे नांव -----------------------------------------------

**समुहसंघटक (स.वि.वि.)**

---

## छाननी समिती

**छाननी समितीचा अभिप्राय -** उपरोक्त अर्जातील सादर केलेली माहिती तपासली असून ती बरोबर आहे. सदर अर्ज पात्र / अपात्र आहे. अपात्र असल्यास अपात्रतेचे कारण - ______________________________

**समाजसेवक (स.वि.वि.)** **समाज विकास अधिकारी (स.वि.वि.)**

---

### आवश्यक कागदपत्रे. (कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे)

१. बचत गट स्थापनेबाबत ठरावाची प्रत.
२. सभासदांची यादी.
३. बचत गटाचे पॅनकार्ड.
४. करत असलेल्या व्यवसायाचा तसेच मासिक उत्पन्नाचा तपशिल.
५. व्यवसायाठी वापरात असलेल्या जागेबाबतचा पुरावा.
६. बचत केलेबाबत बँक पासबुकच्या प्रमाणीत प्रती.

### अटी व शर्ती :-

१. हे अर्थसहाय्य किमान ५, ३, २ वर्षे पूर्ण झालेल्या व नियमित मासिक बचत असणाऱ्या महिला बचत गटास मिळू शकेल.
२. अर्जासोबत तिन्ही पदाधिका-यांचे अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचे फोटो लावणे आवश्यक राहील.
३. महिला बचत गटाच्या बँक खात्यामध्ये किमान रु. १०,०००/- शिल्लक असणे आवश्यक आहे तसेच रक्कम कर्ज स्वरुपात दिली असल्यास किंवा ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक केली असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
४. या निधीचा उपयोग महिला बचत गटामार्फत सुरु असलेल्या उद्योगाच्या/व्यवसाच्या सक्षमीकरणाकरीता करण्यात यावे.
५. बचत गटाचे खाते हे राष्ट्रीयकृत, शेड्युल्ड बँक किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक (गव्हर्नमेंट अंडरटेकींग) यामध्ये असेल त्या बचत गटांनाच या योजनेचा लाभ घेता येईल.
६. अशा प्रकारचे अर्थसहाय्य एकदाच गटाला मिळू शकेल.
७. सदर योजनेचा लाभ गटामार्फत सुरु असलेल्या व्यवसाय तसेच त्यांच्या बचतीच्या लेख्याची तपासणी केल्यानंतर पात्र ठरेलल्या महिला बचत गटास देण्यात येईल.
८. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
९. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील.